महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
दालन क्र. ६१२, ६ वा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
Email ID :- deskhkp.gad-mh@mah. gov.in

क्र.:- सेवाक-२०२१/ प्र.क्र. ४२ /गृहव्य (का.२४) दिनांक :- १९ ऑगस्ट, २०२६

## निविदा सूचना

### सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) येथे १५ झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर घेण्यासाठी सेवासंविदेचा करार करणेबाबत.

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई येथे एक वर्षाच्या कालावधीसाठी १५ झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर घेण्यासाठी सेवासंविदेचा करार करावयाचा असून, याकरीता निविदेमधील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक व पात्र नोंदणीकृत संस्थांकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

२. निविदेच्या अटी व शर्ती विचारात घेऊन प्रतीमाह आकारण्यात येणारे झेरॉक्स मशिन भाड्याचे दर, त्यामध्ये अनुज्ञेय प्रती व त्यांनतरच्या प्रत्येक प्रतींचा दर इ. नमुद करुन तांत्रिक लिफाफा व अतांत्रिक लिफाफा असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे मध्ये कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग ( कार्या. गृहव्य/२४) मंत्रालय, विस्तार इमारत, ६ वा मजला, दालन क्र. ६१२, मुंबई येथे दि. १९.०८.२०२६ ते दि. २७.०८.२०२६, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करावेत. त्यानंतर आलेली निविदा स्वीकारण्यात येणार नाही. दोन लिफाफा पध्दतीने निविदा सादर न केल्यास निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

३. प्राप्त निविदा उघडण्याची तारीख, वेळ निविदाकाराने लिफाफ्यावर नमूद केलेल्या e - mail पत्त्यावर/भ्रमणध्वनी क्रमांकावर कळविण्यात येईल. त्यासाठी लिफाफ्यावर e-mail तसेच भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा, याबाबतची जबाबदारी निविदाकाराची राहील.

आपला,

(सो. ल. लवांडे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

१. निविदेबाबतच्या अटी व शर्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

१) निविदाकाराने निविदा सादर करण्यापूर्वी खालील शासन निर्णय/ परिपत्रक/ अधिसुचनांचे अवलोकन करावे:-
अ. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय, क्रमांक भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६.
ब. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय, क्रमांक भांखस २०२१/ प्र.क्र.८/ उद्योग-४, दिनांक ०७ मे, २०२१.

२) संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे बंधनकारक असून, त्यासाठी निविदाकारांनी सदर ठिकाणी कार्यालय असल्याबाबत गुमास्ता लायसन्स (Shop and Establishment License/उद्योग आधार) तसेच, सदर जागा भाड्याची असल्यास भाडेकरार सादर करावा.

३) तांत्रिक निविदेत मागणी केलेली कागदपत्रे निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

४) पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर तात्काळ (२४ तासांच्या आत) ऑल इन वन सुविधेसह पाठपोट प्रती देणारे अद्ययावत सुविधांयुक्त झेरॉक्स मशिन .(ए ३, ड्युप्लेक्स नेटवर्क, हायस्पीड, स्कॅनर, पेन ड्राईव्ह व इंटरनेटशी जोडणी करता येणारे इ. सुविधांयुक्त) विभागात बसविणे आवश्यक आहे. तसेच, सदर मशिन नादुरुस्त झाल्यास मशिन तात्काळ दुरुस्त करण्यासाठी तंत्रज्ञाची विभागात नेमणूक करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. अन्यथा पुरवठादार संस्थेकडून प्रतिदिन रुपये २००/- दंड आकारण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत कार्यालयीन कामाच्या दिवशी १ तासापेक्षा जास्त मशिन बंद राहता कामा नये.

५) प्रत्येक महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या ५ तारखेच्या आत देयक कक्ष अधिकारी (का.गृहव्य), सा.प्र.वि. यांच्याकडे सादर करावे.

६) देयकाची रक्कम पुरवठादारास अदा करण्यासाठी पुरवठादाराने अवर सचिव (कार्या. रोखशाखा), सामान्य प्रशासन विभाग, तिसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे बँकेच्या खात्याचा तपशील सादर करणे आवश्यक राहील. सर्व परिपूर्ण माहीतीसह देयके सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

७) निविदा फॉर्मवर निविदाकाराची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

८) विभागातर्फे फक्त झेरॉक्स मशिन ठेवण्यासाठी जागा, वीज व कागद पुरविण्यात येतील.

९) झेरॉक्स मशिनचे टोनर, मशिनची दुरुस्ती व इतर आवर्ती खर्च पुरवठादाराने करावयाचा आहे.

१०) प्रिंटींगचा दर्जा उत्तम असणे आवश्यक आहे.

११) प्रसिध्द करण्यात आलेली निविदा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अथवा निविदा मसुद्यामध्ये बदल करण्याचा अधिकार सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना राहील.

१२) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि. ०१ डिसेंबर २०१६ मधील मुद्दा क्र. ४.६ नुसार यशस्वी निविदाकाराला सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे कंत्राट मुल्याच्या ३ टक्के इतकी अनामत रक्कम शासन निर्णयात नमूद केल्यानुसार १५ दिवसांच्या आत जमा करणे बंधनकारक राहील. अन्यथा, सामान्य प्रशासन विभाग निकालाची अधिसूचना रद्द करु शकेल. तसेच, सदर उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि. ०१ डिसेंबर २०१६ मधील मुद्दा क्र. ४.६ मधील अनामत रक्कमेसंदर्भातील तरतूदी लागू

राहातील.

१३) निविदाकाराने तांत्रिक व वाणिज्यिक निविदांमधील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित निविदाकाराची निविदा रद्द करण्यात येईल.

१४) प्रसिध्द करण्यात आलेली निविदा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अथवा निविदा मसुद्यामध्ये बदल करण्याचा अधिकार सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना राहील.

१५) कराराच्या अनुषंगाने यशस्वी निविदाकार व सामान्य प्रशासन विभाग यांच्यात न्यायालयीन प्रकरण उद्भभवल्यास ते मुंबई शहर येथील न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी व खर्च सबंधित संस्थेचा राहील.

१६) निवड झालेल्या निविदाकार संस्थेने करार करण्यास नकार दिल्यास तसेच, करारातील अटींचे उल्लंघन केल्यास सदर संस्था अपात्र ठरवण्यात येवून संस्थेची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संस्थेवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१७) यशस्वी निविदाकार संस्थेस विभागाशी असलेला करार संपल्यानंतरही पुढील दर करार होईपर्यंत निविदा सूचनेमध्ये नमूद सर्व अटी व शर्ती नुसार स्विकृत दराने सेवा उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

१८) निविदा मसुद्याचे सूक्ष्म अवलोकन करून परिपूर्ण निविदा सादर करण्याची दक्षता निविदाकाराने घ्यावी.

१९) अंतिम निवड झालेल्या निविदाकार विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार सामान्य प्रशासन विभागासोबत रु. ५००/- च्या मुद्रांक पत्रावर करारनामा करणे बंधनकारक राहील.

२०) कोणत्याही शासकीय/ निमशासकीय/ सहकारी संस्थेने निविदाकार संस्थेस काळ्या यादीत टाकले नसल्याचे/ बंदी घातले नसल्याचे व कोणताही खटला दाखल केलेला नसल्याचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२१) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि. ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये निर्गमित शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्दतीची सुधारीत नियमपुस्तिका व त्याअंतर्गत वेळोवेळी निर्गमित विविध शासन निर्णयांनुसार सुक्ष्म व लघु उद्योग तसेच, स्टार्टअप घटकांकरीता अनुज्ञेय तरतूदी निविदा प्रक्रियेस लागू राहतील. सदर तरतूदींचा लाभ घ्यावयाचा असल्यास वैध कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

<u>२. अस्विकृती:-</u>

१) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथील अधिकारी/कर्मचा-यांचे नातेसंबंधातील जवळच्या नातेवाईकांना या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. सदर प्रयोजनासाठी जवळच्या नातेवाईकांची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे: -

(अ) हिंदू अविभक्त कुटुंबाचे सदस्य

(ब) त्यांचे पती किंवा पत्नी

(क) वडील, आई, मुलगा, सून, मुलगी, जावई, भाऊ, बहिण, यांच्याप्रमाणे संबंधित असलेले.

२) ज्या निविदाकार संस्थेची यापूर्वी शासकीय/निमशासकीय/सहकारी संस्था यांना सेवा पुरविण्याकरीता निवड केली होती, अशा निविदाकार संस्थेविरोधात कोणतीही तक्रार संबंधित कार्यालयास प्राप्त झाली होती व त्या तक्रारीत तथ्य असेल अथवा त्या तक्रारीचे रितसर निवारण झालेले नसेल, अशा निविदाकार संस्थेला या निविदा प्रक्रियेमध्ये भाग

घेता येणार नाही. तसेच अशा निविदाकाराची अन्य संस्था असल्यास त्या संस्थेला किंवा त्या कंत्राटदाराच्या जवळच्या नातेवाईकाची वा भागीदाराची अन्य संस्था असेल तर अशा संस्थेला किंवा कंत्राटदाराला निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही.

## ३. बयाणा रक्कम (EMD):-

१) निविदा स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने रु.२०,०००/- इतकी बयाणा रक्कम (EMD) विहित स्वरुपात तांत्रिक लिफाफ्यासह जमा करणे आवश्यक आहे.

२) बयाणा रक्कम भरण्यापासून विहित निकषानुसार सुट असल्यास, त्याबाबतचे नजीकच्या काळातील सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र स्पष्ट सही शिक्क्यासह संबंधित निविदाकाराने निविदेसोबत सादर करावे.

३) निविदा प्रक्रिया अंतिम झाल्यानंतर, निविदा स्वीकृत न झालेल्या इतर निविदाकारांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल.

४) निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल.

५) बयाणा रक्कमेवर (EMD) कोणतेही व्याज देय असणार नाही.

## ४.अनामत रक्कम (Security Deposit):-

१) यशस्वी निविदाकाराच्या बाबतीत उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि. ०१ डिसेंबर, २०१६ मधील मुद्दा क्र. ४.६ नुसार सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे कंत्राट मुल्याच्या ३ टक्के इतकी अनामत रक्कम १५ दिवसांच्या आत शासन निर्णयात नमूद प्रकारे/स्वरुपात जमा करणे बंधनकारक राहील. निविदाकाराने करारातील अटी व शर्तींचा भंग केल्यास सदरची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२) या कराराच्या किंवा अन्य कराराच्या अटीनुसार कंत्राटदाराकडून देय असलेली सर्व नुकसान भरपाई किंवा इतर रकमा या अनामत रकमेमधून वजा केल्या जातील.

३) अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

४) करार संपल्यानंतर ९० दिवसांच्या मुदतीत निविदाकारास अनामत रक्कम परत दिली जाईल.

## ५. निविदा खालील कारणास्तव नाकारण्यात येतील:-

१) निविदाकारांनी निविदा सादर करण्याबाबत निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन केले नाही.

२) निविदाकारांनी निविदा किंवा निविदा प्रक्रियेत कोणत्याही कामाचे किंवा परवानगी दिलेल्या वेळेत किंवा अन्य कोणतीही परिस्थितीत बदल करण्याचे प्रस्तावित केले असेल.

३) निविदाकारांनी दस्तऐवजाच्या कोणत्याही पृष्ठावर कोणतीही सुधारणा, वाढ व फेरबदल केले असेल.

४) निविदा नमुन्यामधील कोणतीही पृष्ठे काढून टाकली असतील किंवा बदल केले असेल.

५) निविदाकारांनी मागणीनुसार मूळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर न केल्यास अथवा अपूर्ण सादर केल्याचे आढळल्यास किंवा अपलोड केलेल्या प्रती व मूळ प्रती यामध्ये फरक आढळल्यास सदर निविदा, निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

६) निविदाकाराने अतांत्रिक/वित्तीय निविदेमधील दर अंक व अक्षरामध्ये सादर केलेले नाही.

## ६. सुरक्षा ठेव (अनामत रक्कम)

खालील प्रकरणी जप्त केली जाईल:-

१) कार्यादेश दिलेला निविदाकार स्विकृत निविदा कालावधीत कोणत्याही कारणाने सेवा पुरविण्यास असमर्थ ठरल्यास.

२) निविदेतील अटी व शर्तीचा भंग केल्यास.

## ७. कायद्याचे नियमन व विवादाचा निपटारा:-

१) कार्यादेश व करारासंबंधीत उद्भवलेल्या कोणत्याही वादग्रस्त मतभेदाचे सह सचिव/उप सचिव (गृहव्य) तथा अध्यक्ष, खरेदी समिती, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई आणि संस्थेचे प्रतिनिधी थेट चर्चा करुन सौदार्हपूर्ण वातावरणात निराकरण करण्याचा प्रयत्न करतील.

२) कराराच्या अनुषंगाने यशस्वी निविदाकार संस्था व सामान्य प्रशासन विभाग यांच्यात न्यायालयीन प्रकरण उद्भभवल्यास ते मुंबई शहर येथील मा. न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी व खर्च सबंधित संस्थेचा राहील.

## ८. दिवाळखोरी आणि कर्तव्यात कसुरीसाठी दरकरार समाप्ती:-

१) दिवाळखोरीसाठी समाप्तीः-

स्विकृत निविदाकार संस्था दिवाळखोर आढळल्यास, अशा संस्थेस सह सचिव/उप सचिव (गृहव्य) तथा अध्यक्ष, खरेदी समिती, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई हे १ महिन्याची नोटीस देऊन कोणतीही नुकसान भरपाई न देता कार्यदेश/करार संपुष्टात आणेल.

२) खालीलप्रमाणे सेवा करार संपुष्टात आणण्यात येईलः

अ) शासनाने कार्यादेशाद्वारे दिलेल्या कालावधीत किंवा वाढीव कालावधीत स्विकृत निविदाकर संस्था सेवा देण्यास अयशस्वी ठरल्यास.

ब) स्विकृत निविदाकार संस्था कार्यादेश व करारांतर्गत दिलेल्या अटी व शर्तीनुसार कोणत्याही जबाबदा-या पार पाडण्यात अयशस्वी ठरल्यास.

९. निविदा दोन लिफाफे (Two Bid) पद्धतीनुसार स्विकारली जाईल:-

अ) लिफाफा क्र.१:- तांत्रिक दरपत्रक (फॉर्म-अ)
(तांत्रिक लिफाफ्यात खालील कागदापत्रांच्या प्रमाणित/साक्षांकीत प्रती सादर कराव्यात.)

| | |
|---|---|
| १. | तांत्रिक निविदा प्रपत्र (परिशिष्ट-१) |
| २. | संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ /कंपनी नोंदणी अधिनियम/सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम, २००६/ दुकाने व आस्थापना अधिनियम, २०१७/उद्यम आधार नोंदणी इ.) |
| ३. | संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे बंधनकारक असून, त्यासाठी निविदाकारांनी सदर ठिकाणी कार्यालय असल्याबाबत गुमास्ता लायसन्स (Shop and Establishment License/उद्योग आधार) तसेच, सदर जागा भाड्याची असल्यास भाडेकरार सादर करावा. |
| ४. | बयाणा रक्कम भरल्याची पावती सोबत जोडण्यात यावी.<br>अथवा, बयाणा रक्कम भरण्याच्या अटीतून सूट देण्यात आली असल्यास, त्याअनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्र सादर करण्यात यावेत. तसेच, एम.एस.एम.ई/ उद्यम आधार नोंदणी प्रमाणपत्र/ Start-up Recognition Certificate इ. मधील नोंदणीची बाब ही निविदेतील नमूद सेवेशी मिळतीजुळती असल्यासच निविदाकारास बयाणा रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल, अन्यथा निविदाकारास अपात्र करण्यात येईल. |
| ५. | शासकीय/निमशासकीय/सहकारी कार्यालयांमध्ये कमीत कमी ३ वर्षे समाधानकारकरीत्या काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र अथवा कार्यादेशाच्या प्रती सादर कराव्यात. |
| ६. | आयकर नोंदणी क्रमांक (PAN Card/ TAN Card) छायांकित प्रत. तसेच, संस्थेच्या नावाने लगतच्या तीन आर्थिक वर्षाच्या कालावधीचे आयकर रीटर्न भरल्याच्या कागदपत्रांच्या प्रतींची छायांकित प्रत सोबत जोडण्यात याव्यात. (आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिव वर्ष २०२३-२४, आर्थिव वर्ष २०२४-२५) |
| ७. | वैध वस्तू व सेवाकर नोंदणी (GST Registration) प्रमाणपत्र तसेच, लगतच्या ३ महिन्यांचा वस्तू व सेवाकर (GSTR-3B) रीटर्न भरल्याच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडण्यात याव्यात. |
| ८. | कोणत्याही शासकीय/ निमशासकीय/ सहकारी संस्थेने निविदाकार संस्थेस काळ्या यादीत टाकले नसल्याचे/ बंदी घातले नसल्याचे व कोणताही खटला दाखल केलेला नसल्याचे स्वप्रमाणित हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. |

सर्व तांत्रिक निविदा दस्तऐवज वरील अनुक्रमांमध्ये निर्देशांक पृष्ठ आणि पृष्ठ क्रमांकांसह सादर कराव्यात.

१) ९-अ मधील विविध दस्तऐवजाची निविदाकार पुर्तता करीत नसल्यास, खरेदी समिती नोंद घेईल आणि त्या निविदाकर्त्यांचा लिफाफा क्र. २ पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेण्यात येणार नाही. तांत्रिक निविदा तपासणीनंतर पात्र असल्याचे आढळून आलेल्या निविदाकारांचा अतांत्रिक/वित्तीय निविदा लिफाफा उघडण्यात येईल.

२) तांत्रिक निविदा लिफाफा उघडल्यानंतर त्यांची छाननी करुन पात्र व अपात्र उमेदवार ठरविण्यात येतील. अपात्र उमेदवारांच्या निविदा नाकारण्यात येतील व त्यांची बयाणा रक्कम (EMD) निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल.

ब) लिफाफा क्र. २:- अतांत्रिक/वित्तीय निविदा लिफाफ्यात खालील दस्तऐवज असेल.

१) अतांत्रिक/वित्तीय निविदा परिशिष्ट २ मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार असावी.

१०. निविदाकाराची अंतिम निवड:-

तांत्रिक अहर्तेमध्ये पात्र ठरलेल्या संस्थांच्या अतांत्रिक/वित्तीय निविदा विचारात घेण्यात येतील. सर्वात न्यूनतम दर असलेल्या निविदाकाराची (एल-१) निवड करण्यात येईल.

एकापेक्षा अधिक निविदाकारांचे न्यूनतम दर समान असल्यास, शासकीय कार्यालयात सेवा पुरविण्याचा अनुभव (संख्या व कालावधी) तसेच, खरेदी समितीस योग्य वाटतील अशा गुणवत्तेच्या बाबी विचारात घेऊन संस्थेची अंतिम निवड करण्यात येईल. (शासकीय कार्यालयाचे नाव, भाडेतत्वावर मशिन पुरवठा केल्याची संख्या व कालावधी याबाबतचे विवरण संस्थेच्या लेटरहेडवर आवश्यक त्या पुराव्यासह सादर करावे.)

मी/आम्ही वरील निविदा सूचनेतील सर्व कलमे (अ.क्र. १ ते १०) काळजीपूर्वक वाचली असून, मी/आम्ही सदर निविदा सूचनेतील सर्व अटींशी सहमत आहे/आहोत.

दिनांक:-

ठिकाण:-

निविदाकार संस्थेचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

<u>परिशिष्ट १</u>

<u>तांत्रिक निविदा प्रपत्र (Technical Bid)</u>

टिप:-निविदाकार संस्थेने सर्व आवश्यक माहिती निविदा प्रपत्रात भरावी व पुराव्याच्या समर्थनार्थ कागदापत्रांच्या प्रमाणित/साक्षांकीत प्रती सादर कराव्यात.

| | |
|---|---|
| १) | निविदाकार संस्थेचे/कंपनीचे नाव व पत्ता:- |
| २) | संपर्क क्रमांक:-<br>अ) दुरध्वनी क्र.:- ब) भ्रमणध्वनी क्र.:-<br>क) ई-मेल:- ड) फॅक्स:- |
| ३) | ३) बँकेचे नाव व पत्ता:-<br>अ) ब्रँच कोड:- ब) खाते प्रकार:-<br>क) बँक खाते क्रमांक:- ड) MICR कोड:-<br>इ) IFSC कोड:- |
| ४) | संस्थेचे नोंदणी क्रमांक व प्रमाणपत्र (दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ /कंपनी नोंदणी अधिनियम/सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम, २००६/ दुकाने व आस्थापना अधिनियम, २०१७/उद्यम आधार नोंदणी इ.):- |
| ५) | संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे बंधनकारक असून, त्यासाठी निविदाकारांनी सदर बठिकाणी कार्यालय असल्याबाबत गुमास्ता लायसन्स (Shop and Establishment License/उद्योग आधार) तसेच, सदर जागा भाड्याची असल्यास भाडेकरार सादर करावा. |
| ६) | बयाणा रक्कम भरल्याची पावती सोबत जोडण्यात यावी. अथवा, बयाणा रक्कम भरण्याच्या अटीतून सूट देण्यात आली असल्यास, त्याअनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्र सादर करण्यात यावेत. तसेच, एम.एस.एम.ई/ उद्यम आधार नोंदणी प्रमाणपत्र/ Start-up Recognition Certificate इ. मधील नोंदणीची बाब ही निविदेतील नमूद सेवेशी मिळतीजुळती असल्यासच निविदाकारास बयाणा रक्कम भरण्याबाबत सूट देण्यात येईल, अन्यथा निविदाकारास अपात्र करण्यात येईल. |
| ७) | शासकीय/निमशासकीय/सहकारी कार्यालयांमध्ये कमीत कमी ३ वर्षे समाधानकारकरीत्या काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र अथवा कार्यादेशाच्या प्रती सादर कराव्यात. |
| ८) | आयकर नोंदणी क्रमांक (PAN Card/ TAN Card) छायांकित प्रत. तसेच, संस्थेच्या नावाने लगतच्या तीन आर्थिक वर्षाच्या कालावधीचे आयकर रीटर्न भरल्याच्या कागदपत्रांच्या प्रतींची छायांकित प्रत सोबत जोडण्यात याव्यात. (आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिव वर्ष २०२३-२४, आर्थिव वर्ष २०२४-२५) |
| ९) | वैध वस्तू व सेवाकर नोंदणी (GST Registration) प्रमाणपत्र तसेच, लगतच्या ३ महिन्यांचा वस्तू व सेवाकर (GSTR-3B) रीटर्न भरल्याच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडण्यात याव्यात. |
| १०) | कोणत्याही शासकीय/ निमशासकीय/ सहकारी संस्थेने निविदाकार संस्थेस काळ्या यादीत टाकले नसल्याचे/ बंदी घातले नसल्याचे व कोणताही खटला दाखल केलेला नसल्याचे स्वप्रमाणित हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. |

(तांत्रिक निविदेतील सर्व पृष्ठे अनुक्रमित असावी व त्यावरील सर्व पृष्ठांवर अधिकृत स्वाक्षरीकाराने स्पष्ट स्वाक्षरी केलेले व मुद्रांकीत केले पाहिजे)

मी/आम्ही वरील निविदा दस्तएवजांचे सर्व नियम व अटी काळजीपूर्वक वाचल्या आहेत आणि मी/आम्ही त्यांचे पालन करण्यास बांधील आहे/आहोत.

दिनांक:-

ठिकाण:-

निविदाकार संस्थेचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

*******************

## परिशिष्ट २

## अतांत्रिक वित्तीय दरपत्रक (फॉर्म ब)

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) येथे खालील तक्ता क्र. १ येथे दर्शविल्याप्रमाणे झेरॉक्स मशिनची आवश्यकता आहे. त्यानुसार निविदाकार संस्थेने तक्त्या क्र. २ येथील वित्तीय दरपत्रकात झेरॉक्स मशिनच्या भाड्याचे दर नमूद करावे.

### तक्त्या क्र.१

### विभागासाठी लागणा-या १५ झेरॉक्स मशिनचे विवरण

| अ.क्र. | मशिनची क्षमता | नग | Specification | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ट्रे संख्या | प्रिंटिंग व कॉपिंग | नेटवर्क | पेपर साईज |
| १. | ४० -६०प्रति /मिनिट (ppm) | १५ | २ ट्रे | ड्युप्लेक्स (Both Side) | नेटवर्क जोडणी असणारे | A-३/ A-४/ Legal |

### तक्त्या क्र. २

### वित्तीय दरपत्रक

| अ.क्र. | मशिनची क्षमता | नग | प्रतिमाह प्रति मशिनचे भाडे दर (रु.) | मासिक भाड्यात अनुज्ञेय असलेल्या प्रती | त्यांनतर काढलेल्या प्रत्येक प्रतीचा दर (रु.) | GST (रु.) | एकूण रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४०-६० प्रति/मिनिट (ppm) | १ | | | | | |

दिनांक-
ठिकाण -

निविदाकार संस्थेचे नाव
स्वाक्षरी व शिक्का

*********************